रे.मु.नं. १६८/२०२१

निशाणी ६९ खाली

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

नाव – मच्छींद्र तुळशीराम मांडे

वय– ४९ वर्षे धंदा – शेती

पत्ता- रा. मढेवडगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर.

(विधीज्ञ झेड. टी. गायकवाड यांचे कारकुन श्री. जावेद शेख यांनी सांगितले की, साक्ष सुरु करण्यास काहीही हरकत नाही असे वकील साहेबांनी सांगितले.)

**वादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.बी.झराड यांच्यातर्फे सा.क्र. ०१ यांचा शपथेवर पुढील उलटपास सुरु-**

९. हे म्हणणे खरे आहे की, मी रे. मु.न. २१८/१९९६ ची नक्कल कोर्टात दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, रे. मु. न. २१८/१९९६ यांनी सिताराम मांडे व इतर यांच्याविरुध्द भाऊ बाजीराव मांडे, तुळशीराम बाजीराव मांडे, सर्जेराव मांडे, रमेश मांडे, अनिल सर्जेराव मांडे यांनी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण १२ पर्यत झालेले आहे, त्यामुळे मला इंग्रजी लिहिता वाचता येते. आता मला निशाणी ५० वरील कागद दाखविण्यात आला. सदरचा दावा हा भाऊ बाजीराव मांडे, तुळशीराम बाजीराव मांडे, सर्जेराव मांडे, रमेश मांडे, अनिल सर्जेराव मांडे यांनी सिताराम मांडे व इतर यांच्याविरुध्द दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याचा निकाल हा दि. २९.०१.२००० साली वादीच्या बाजुने लागला.

**प्रश्नः-** या प्रतिवादी कडुन रे.मु.न. २१८/१९९६ या दाव्यातील मिळकतीचा ताबा वादी यांना मिळालेला आहे?

**उत्तरः-** फक्त तुळशीराम बाजीराव मांडे यांना मिळालेला आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकती बाबत अदयाप सरस-निरस मानाने वाटप झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, रे. मु. नं. ७०/२०१३ माझ्या वडीलांनी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये राजेंद्र ज्ञानदेव शिंदे, शंकर नारायण शिंदे, संतोष विठठल शिंदे, विष्णु नारायण शिंदे, रामदास नारायण शिंदे, नाना दत्तु

शिंदे, सचिन विठठल शिंदे हे पक्षकार होते. हे म्हणणे खरे नाही की, रे. मु. न. ७०/२०१३ मध्ये जो आदेश झाला आहे तो प्रतिवादी क्र. १ ते ७ यांच्या विरुध्द झालेला आहे. हे मला सांगता येणार नाही की, रे. मु. न. ७०/२०१३ मध्ये प्रतिवादी क्र. ८ ते ११ यांच्याविरुध्द कोणताही आदेश दिलेला नाही. हे मला सांगता येणार नाही की, माझ्या वडीलांच्या हक्कात दावा मिळकतीबाबत हक्क सोड पत्र वादीनी करुन दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी आजही दावामिळकती मध्ये राहतात. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र. २३८० अन्वये वादींची नावे दावामिळकतीला लागली होती साक्षीदार सांगतो ती पोकळीस्त होती. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र. २३८० रद्द होण्याकामी अर्ज उपविभागीय अधिकारी अहमदनगर यांच्याकडे केलेला होता. हे मला सांगता येणार नाही की, उपविभागीय अधिकारी अहमदनगर यांच्याकडे फेरफार क्र. २३८० रद्द करण्याचा अर्ज करण्यास विलंब झाला होता तो विलंब माफ करण्याचा अर्ज फेटाळा गेला. हे मला सांगता येणार नाही की, त्या अर्जा विरुध्द वरिष्ठ अधिका-याकडे अपिल केलेले नाही. माझे वडील दि. २५.१२.२०१७ रोजी मयत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. २३८० रद्द होवुन मिळण्याकरिता माझ्या वडीलांना कोणत्याही न्यायालयात दाद मागितली नाही. सदर बाबत मी न्यायालयात कागदपत्र दाखल केलेले आहे. तसेच, मी कागदपत्र पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीचे वाटप झालेले नसताना मी बेकायदेशीर बांधकाम सुरु केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा चालु असल्याची बातमी ग्रामपंचायतीला लपवुन ठेवुन बांधकाम सुरु ठेवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंतप्रधान घरकुल आवास योजना अंतर्गत मिळकत नं. ८६८ मध्ये बांधकाम सुरु केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींच्या विरोधात मी श्रीगोंदा पोलिस स्टेशनला खोटी तक्रार दिलेली आहे.

११. दमयंती सदाशिव जगताप व भिमाबाई शिंदे या माझ्या मावळणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या हा दावा दाखल करण्यापुर्वी पासुन त्यांच्या सासरी नांदत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावामिळकतीना त्यांची नावे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर माझ्या मावळणीना कधीच पक्षकार केलेले नाही. दाव्यामध्ये मढेवडगाव येथील गट नं. १७० व १०१ या मिळकती समाविष्ट केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्या

मिळकतीबाबत वादी व आमच्यात हा दावा दाखल करण्यापुर्वी वाटप झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या मिळकती वादी यांनी या दाव्यात समाविष्ट केलेल्या नाहीत. माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ चा मजकुर चुकीचा लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, रे. मु. न. २१८/१९९६ हा माझ्या वडीलांनी व वादीने ति-हाईत इसमाचे अतिक्रमण काढुन घेण्यासाठी दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीने व माझ्या वडीलांनी दरखास्त एकत्र दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दरखास्तीमध्ये वादी यांना एकत्रीत कुटुंबाकरिता सर्वासाठी ताबा मिळालेला आहे. आता मला निशाणी १०३ वरील कागद वाचुन दाखविण्यात आला. सदर कागद निशाणी १०३ मधील मजकुर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मिळकत ८६८ मध्ये नवीन बांधकाम झाले त्यास मिळकत १५५२ हा नंबर पडलेला आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा हिस्सा नाकारण्याच्या गैरहेतुने प्रेरित होवुन मी खोटे शपथपत्र् दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2025.08.21 14:30:12 +0500

**( रविंद्र. भ. खवले )**

दि. २१.०८.२०२५

२रे सह दि.न्या.क. स्तर,श्रीगोंदा,
जि.अहमदनगर